# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाद्वारे प्रभाग समिती क्रमांक ०६ क्षेत्रातील अनधिकृत बार आणि रेस्टॉरंटवर तोडक कारवाई**

दिनांक २५ फेब्रुवारी २०२५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक ०६ कार्यक्षेत्रातील कॅटवॉक, केम छो या बार अँड रेस्टॉरंटच्या अनधिकृत बांधकामावर आणि ई-बायोटोरियम या कंपनीच्या अनधिकृत पत्राशेडच्या बांधकामावर महापालिका अतिक्रमण विभागामार्फत तोडक कारवाई करण्यात आली. महापालिकेच्या परवाना नियमांचे उल्लंघन आणि अनधिकृत बांधकामांमुळे सार्वजनिक अडथळे निर्माण होत असल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आली. महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने जेसीबी आणि मनुष्यबळाच्या सहाय्याने अनधिकृत बांधकाम हटवण्याची ही मोहीम राबविण्यात आली.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध प्रभागातील अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करणेकामी निर्देशित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्या निर्देशानुसार प्रभागातील अनधिकृत हॉटेल/बार, फेरीवाले, गॅरेजेस, पदपथावरील व्यावसायिक, अनधिकृत होर्डिंग्ज, अनधिकृत झोपड्या यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने दिनांक २५ फेब्रुवारी २०२५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक ०६ कार्यक्षेत्रातील कॅटवॉक, केम छो या बार अँड रेस्टॉरंटच्या अनधिकृत बांधकामावर आणि ई-बायोटोरियम या कंपनीच्या अनधिकृत पत्राशेडच्या बांधकामावर महापालिका अतिक्रमण विभागामार्फत तोडक कारवाई करण्यात आली. सदर कारवाई अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, उपायुक्त (अतिक्रमण) कल्पिता पिंपळे यांच्या निर्देशानुसार, सहाय्यक आयुक्त कांचन गायकवाड, कनिष्ठ अभियंता, फेरीवाला पथक प्रमुख, अतिक्रमण विभाग कर्मचारी, पोलिस विभाग आणि सुरक्षा पथकाच्या उपस्थितीत पार पडली. भविष्यातही महापालिका प्रशासनाकडून शहरातील अनधिकृत बांधकामे आणि नियमबाह्य व्यवसायांवर कठोर कारवाई सुरू राहील, असा इशारा देण्यात आला आहे.